महाराष्ट्र शासन

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती

प्लॉट पी- १०७,एम.आय.डी.सी आवार, महिलारुग्णालयासमोर, बारामतीपिननं-४१३१३३
Phone No.: 02112- 244172 Email Id:deangmcbaramati@gmail.com

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथील उपहारगृह (Cafeteria)सुविधा दोन लिफाफा पध्दतीने ठेकेदारी पध्दतीने उपलब्धतेबाबत.

## जाहिर निविदा सुचना

या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येत आहे की,या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती मुख्य इमारतीतील नियोजीत उपहारगृह (Cafeteria) सुविधा देणे व चालविण्याकरीता या संस्थेच्या संकेतस्थळावर निविदा प्रक्रीयेची अर्ज माहिती प्रसारीत करण्यात येत असून, या संस्थेच्या**www.gmcbaramati.org** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

सदर कॅन्टीन निविदा अर्ज भरण्याचा दिनांक १३/०५/२०२५ रोजी पासून अंतिम दि. २८/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील त्यानंतर आलेल्या निविदा कोणत्याही सबबीवर स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर निवीदा अर्ज प्रक्रीया शुल्क रु.२०००/- (रुपये दोन हजार फक्त) ची शासकीय पावती सदर निविदा प्रक्रिया फॉर्मसोबत जोडुन सादर करण्यात यावी.

अधिष्ठाता,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती

अधिष्ठाता
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,बारामती

जा.क्र. पुअहोशावैमबा/कॅन्टीन/निविदा/1720/२०२५
दिनांक :30/ 5 /२०२५

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती**

प्लॉट पी- १०७,एम.आय.डी.सी आवार, महिलारुग्णालयासमोर, बारामतीपिननं-४१३१३३

Phone No.: 02112- 244172 Email Id: deangmcbaramati@gmail.com

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथील उपहारगृह (Cafeteria)सुविधा दोन लिफाफा पध्दतीने ठेकेदारी पध्दतीने उपलब्धतेबाबत.

**निविदा फॉर्म शुल्क रु.२०००/- (रुपये दोन हजार)**

## निविदा फॉर्म

१. निविदा क्र. : ०१

२. शासकीय पावती क्र. व दिनांक : ..................................................

३ निविदाकाराचे पूर्ण नाव/ राहते घराचा :..................................................

व कार्यालयाचा संपूर्ण पत्ता ...........................................

४. संपर्क दूरध्वनी क्रमांक : ................................................

१. कार्यालय :....................................................

२. निवास :...................................................

३. मोबाईल :....................................................

५. कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट नोंदणी क्रमांकः.....................................................

(संपूर्ण भरलेला निविदा फॉर्म व त्यासोबत प्राप्त अटी शर्ती इत्यादी सर्व कागदपत्रे स्वाक्षरी करुन तसेच साक्षांकित करुन लिफाफा क्र. १ मध्ये परत करणे आवश्यक आहे.)

निविदाधारकाचे / संस्थेचे नाव

स्वाक्षरीः निविदाधारकाचा/संस्थेचा शिक्काः

Scanned with OKEN Scanner

# <u>अ पाकिटात सादर करावयाचे कागदपत्रे</u>

१) संबंधित ठेकेदाराकडे लेबर कंत्राटी कायदा १९७० चा परवाना असणे आवश्यक आहे.

२) मा. अधिश्ठाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या नावाने बयाणा/सुरक्षाठेव रक्कम रुपये २,००,०००/- (रु. दोन लक्ष फक्त) भरलेली पावती जोडणे आवश्यक आहे.

३) भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ चा परवाना असणे आवश्यक आहे. मागील ६ महिन्याचे ई.पी.एफ भरले असल्याबाबतचे चलने व ई.सी.एस. जोडणे आवश्यक आहे.

४) राज्य कामगार विमा अधिनियम १९४७ चा परवाना असणे आवश्यक व मागील सहा महिन्याचे चलने जोडणे आवश्यक आहे.

५) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. तसेच डिसेंबर २०२४ पर्यंतची जी.एस.टी भरलेबाबतचे पुरावे जोडणे आवश्यक आहे.

६) मागील सलग तीन वर्षाची एकुण आर्थिक उलाढाल किमान **५०** लाख किंवा त्यापेक्षा जास्त असावी तसा चार्टर्ड अकेंटंटचा दाखल UDIN NO. सह जोडणे आवश्यक आहे.

७) सरकारी/निमसरकारी संस्था/खाजगी कॅन्टीन चालवण्याचा अनुभव असल्याबाबतचा पुरावा जोडणेआवश्यक आहे.

८) राष्ट्रीयकृत बॅकेची बॅक सोलव्हसी किमत ५० लाखाची असल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

९) मागील सलग तीन वर्षाचा आयकर भरल्याचा दाखला (आय.टी.आर) जोडणे आवश्यक आहे.

१०) ठेकेदाराचे प्रतीज्ञापत्र आणि हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

११) टेडर मधील नमुद अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतीज्ञापत्रामध्ये स्वाक्षरी व शिक्यासह जोडणे आवश्यक आहे.

१२) **<u>पार्टनरशिप असल्यास</u>** त्याबाबतचे पार्टनरशिप डिड झालेबाबत करारपत्र जोडणे आवश्यक आहे.
तसेच पार्टनरशिप (भागीदारी) मधील डिड रजिस्ट्रेशन सर्टिफिकीट जोडणे आवश्यक आहे.

१३) एफ.डी.ए. चा (अन्न व औषधी प्रशासन विभागाचा) नोंदणी दाखला जोडणे आवश्यक आहे.

१४) महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद येथील आरोग्य विभागाचा नोंदणी दाखला जोडणे आवश्यक आहे.

१५) मुंबई दुकाने अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी क्रमांक पत्र जोडणे आवश्यक आहे.

१६) संस्थेचे पॅनकार्ड जोडणे आवश्यक आहे.

वरील १ ते १६ क्रमातील सर्व आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र. अ-१ मध्ये सादर करण्यात आलेली आहेत.

निविदाधारकाचे / संस्थेचे नाव

स्वाक्षरी: निविदाधारकाचा/संस्थेचा शिक्का:

Scanned with OKEN Scanner

# यशस्वी ठेकेदारने उपहारगृह (Cafeteria)निविदा अटी शर्तीनुसार सादर करावयाचे बंधपत्र (करारनामा)

## नियम, अटी व शर्ती–

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या संस्थेतील/महाविद्यालयातील डॉक्टर्स/विद्यार्थी/अधिकारी/कर्मचारी/अभ्यागत तसेच पालक यांच्या करीता असलेले महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीतीलउपहारगृह (Cafeteria)हे त्यांचे आरोग्याचे दृष्टीकोनातून व सुरक्षिततेच्या दृष्टीने, तसेच महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. एमआयएस-१०९३ /१०५३/ सीआर-२१९ /९३/ प्रशसन-२, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक १६ जून १९९७. नूसार व निविदा अटीशर्ती नुसार सदर निवीदा अर्ज प्रक्रीया शुल्क रु.**२०००/–** (रुपये दोन हजार फक्त) राहील. सदर शुल्क या महाविद्यालयातील रोखपाल विभागामध्ये रोख रकमेत भरुन त्याची रितसर शासकीय शुल्क पावतीची प्रत या अर्जा सोबत जोडत आहे.

या संस्थेच्या आवारातील मुख्य इमारतीमधील उपहारगृह (Cafeteria) अटी शर्ती व निविदा प्रक्रीयेनुसार सुविधा राबविण्याचे मान्य करीत आहे.

१) कॅन्टीन निविदा प्रक्रीयेत यशस्वी निविदाधारक म्हणून आमच्या संस्थेस, सदर उपहारगृह (Cafeteria) सुविधा पुरविणे करीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती कॅन्टीन समिती मार्फत निवड करण्यात आली असून, मी या संस्थेने स्वाक्षरी करण्याकरीता प्राधिकृत केलेला प्रतिनिधी असल्याने, खालीलप्रमाणे अटी व शर्ती आमच्या आम्हास/संस्थेस मान्य असून, शासन/प्रशासन/ संस्थेने विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून, आमच्या माझ्या संस्थेच्या वतीने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या संस्थेस उपहारगृह(Cafeteria) सुविधा पुरविण्याकरीता करारनामा लिहून देत आहे.

अ) वर्क ऑर्डर मिळालेपासून सात दिवसाचे आत रु.५००/- च्या स्टॅम्पपेपरवर रजिस्ट्रर्ड नोंदकरुन देणे आवश्यक आहे करारनाम्यातील कोणत्याही अटी/शर्तीचा भंग झालेस मंजूर केलेला ठेका कोणतीही पूर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल. यास माझी/संस्थेची कोणतीही हरकत रहाणार नाही. तसेच प्रपत्र "अ" मधील बंद पाकीटात कागदपत्रा सोबत निविदेतील अटी शर्तीनुसार उपहारगृह(Cafeteria) करीता सुरक्षाठेव रक्कम रुपये २,००,०००/- (रु. दोन लक्षफक्त) इतक्या रकमेचा डि.डि (डिमांड ड्राफ) हा मा. अधिष्ठाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,बारामती यांचे नावे रोखपाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे भरणा करणे बंधनकारक आहे. अन्यथा दिलेले आदेश रद्द करण्यात येईलयाची मला जाणीव आहे.

ब) सदरील उपहारगृह(Cafeteria) ची जागेचे-

| | | |
|---|---|---|
| १) काउंटर+पेन्ट्री | - २०६ | चौ.फु. |
| २) किचन | - २६८ | चौ.फु. |
| ३) किचन मटेरीअल वॉशिंग एरिया | - ०९६ | चौ.फु. |
| ४) हॅन्ड वॉश | - २०८ | चौ.फु. |
| ५) कॅफेटेरीया/कॉमन हॉल | - २२६१ | चौ.फु. |
| एकुण क्षेत्रफळ | - ३०३९ | चौ.फु. |



Scanned with OKEN Scanner

विना भाडे शुल्क (भाडे मुक्त) असल्याने, सदरउपहारगृहातील नियोजीत सर्व खाद्यपदार्थांचे दर हे इतर खाजगी उपहारगृह /मेस/हॉटेल/रेस्टॉरन्ट/कॅन्टीन यांचे दरापेक्षा, न्युनतम दर असणे आवश्यक असून, त्यांचा दर्जाही उत्तम असणे आवश्यक आहे, सदर उपहारगृहाकरीता वीज व पाण्याचे वापर केलेनुसार मिटर रिडींगप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच समितीमार्फत प्रमाणित केलेल्या दराने रोखपाल विभागामध्ये रोख स्वरुपात विहीत कालावधीतच (१ ते ५ तारखेपर्यंत) दरमहा भरणा करणे बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.कॅफेटेरीया/कॉमन हॉल - २२६१ चौ.फु. या जागेवर अतितात्कालीन परीस्थतीमध्ये प्रशासनास जेव्हा जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा आपणस आगाऊ सुचना दिल्यानंतर सदर कॅफेटेरीया/कॉमन हॉल - २२६१ चौ.फु.मोकळा करुन स्वच्छ करुन देणे बंधनकारक राहील.

क) आम्ही/ मी सदरचे (Cafeteria)उपहारगृह मध्ये निविदा प्रक्रीयेनुसार यशस्वी ठेकेदार असून, (न्युनतम दरपत्रक) प्रपत्र क्र.२ "ब" मध्ये नमूद केलेल्या दराप्रमाणेच संस्थास्तरावरील कॅन्टीन समितीने प्रमाणित व निश्चित करणेत आलेले ( सर्व करासहित) दराप्रमाणे खादयपदार्थ विक्री करणे बंधनकारक राहिल याची मला जाणीवआहे त्यानुसार या अटीचे पालन करणे बंधकनकारक राहील.

ड) कॅन्टीन (उपहारगृह) करीता निविदेतील दर हे कॅन्टीन समिती मार्फत मान्य व निश्चित झालेल्या दरात कोणताही बदल करणेचा अधिकार ठेकेदारास असणार नाही याची मला/संस्थेस जाणीव आहे.

२) या संस्थेच्या आवारातील मुख्य इमारतीमधील (Cafeteria)उपहारगृह ची सेवा प्रशासकीय कामकाजाचे दिवशी पूर्ण वेळे पर्यंत दिली पाहिजे व बाहयरुग्ण विभाग चालू असलेल्या सर्व दिवशी सकाळी ७.०० ते सायं. ७.०० वाजे पर्यंत तसेच आवश्यक त्यावेळी आगाऊ सुचना दिल्यास उपहारगृह सुरु ठेवणे आवश्यक आहे याची मला जाणीव आहे.

३) (Cafeteria)उपहारगृहा करीता ठेकेदार यांनी आवश्यक तेवढे महाराष्ट्रीयन कर्मचारी नेमणे आवश्यक असून, त्यांना ठेकेदारा मार्फत ओळखपत्रे व गणवेश असणे बंधकनकारक आहे.

४) (Cafeteria)उपहारगृह मध्ये ठेकेदाराने कामास ठेवलेल्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण नाव त्यांचे संपूर्ण पत्ते यांची यादी फोटोसह त्यांना कामावर ठेवण्यापूर्वी पोलीस खात्यास व संस्थेस कागदापत्री पुराव्यासह माहिती देणे बंधनकारक आहे.

५) कॅन्टीन (उपहारगृह) मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने व पोलीस यंत्रणेच्या सुचनेप्रमाणे ठेकेदाराचे निगराणी खाली ठेकेदाराने स्वतः स्वखर्चाने किचन व हॉलमध्ये सी.सी.टी.व्ही. व्यवस्था करणे बंधनकारक आहे. तसेच ठेकेदाराने उपहारगृहाच्या स्वच्छतेकरीता लागणाऱ्या वस्तू उदा. फिनेल, साबण, झाडू, खराटे, सुगंधित वडया व इतर यांचा दैनंदीन खर्च निविदाधारकास स्वतः करावा लागेल आणि उपहारगृहातील व त्याचे आसपास भागातील ओला व सुका कचऱ्याचे विभाजन करुन याची तात्काळ म.न.पा/नगरपरिषदसंस्थेच्या नियमानुसार विल्हेवाट लावण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. याची मला जाणीव आहे.

...३...

Scanned with OKEN Scanner

६) कॅन्टीन (उपहारगृह) ची सुविधा हि विद्यार्थी/डॉक्टर/अधिकारी/ कर्मचारी/ अभ्यागत/ पालक (महाविद्यालयास भेटीसाठी येणारी प्रत्येक व्यक्ती) यांच्यासाठीच राहील व तसेच उपहारगृहामध्ये टेबल सर्व्हिसेस देणे बंधणकारक राहिल याची मला जाणीव आहे.

७) कॅन्टीन (उपहारगृह) च्या असुविधामुळे विद्यार्थी/डॉक्टर/अधिकारी/ कर्मचारी/ अभ्यागत/ पालक (भेटीसाठी येणारी प्रत्येक व्यक्ती) यांना त्रास झाल्याची तक्रार होणार नाही. याची दक्षता घ्यावी अन्यथा कारवाई करण्यात येईल. सदर कामे तसेच दैनंदीन स्वच्छता व साफसफाई न केल्यास इतर यंत्रणे मार्फत स्वच्छता करुन घेतली जाईल व त्याचा खर्च आपल्या सुरक्षाठेव रकमेतून वळती करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

८) निविदाधारकाने कॅन्टीन (उपहारगृह) चे भिंतीवर योग्य आकाराचे बोर्डावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,बारामती उपहारगृह **(CAFETERIA)**असा फलक मुख्य दाराच्यावरती बाहेरील बाजुस तसेच उपहारगृहामध्ये आतील बाजुस निविदाधारकाचे नाव, दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक व खाद्यपदार्थांचे मान्य व निश्चीत केलेल्या "दराचा" फलक कॅन्टीन (उपहारगृह) मध्ये दिसेल अशा अक्षरांनी दर्शनी भागात लावणे यशस्वी ठेकेदार संस्थेस बंधनकारक राहील.

९) सदर कॅन्टीन (उपहारगृह) मध्ये मद्यपान/गुटखा/धुम्रपानास पुर्णपणे बंदी असेल व येथे बाल कामगार कामास नाही असा फलक दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.

१०) कॅन्टीन (उपहारगृह)मध्ये संशयित वस्तू व संशयित व्यक्ती आढळल्यास ठेकेदारामार्फत पोलीस यंत्रणेस व या कार्यालयास तात्काळ कळविण्याची जबाबदारी ठेकेदार संस्थेवर राहिल याची मला जाणीव आहे.

११) कॅन्टीन (उपहारगृह) चे स्वच्छतेबाबतच्या अहवालानूसार वेळोवेळी आदेश निर्गमित करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवणेत येत आहेत. सदर निर्णय ठेकेदार संस्थेवर बंधनकारक राहिल.

१२) उपहारगृहातील आवश्यक कामे या प्रपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर कॅन्टीन (उपहारगृह) मधील बांधकामाच्या दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदार संस्थेची राहिल. ठेकेदार संस्थेने वेळोवेळी स्वखर्चाने दूरुस्त्या करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्त्या वेळीच न झाल्यास व सदर कॅन्टीन (उपहारगृह) चे नादूरुस्तीमुळे कुठलेही नुकसान झाल्यास सुरक्षाठेव रकमेतून सदरच्या दुरुस्त्यांचा खर्च कपात केला जाईल.

१३) ठेकेदारास कॅन्टीन (उपहारगृह) चालविण्यासाठी मंजूर केलेल्या जागेत असलेल्या बांधकामा व्यतीरिक्त इतरत्र कोणत्याही प्रकारचे शेड/केबीन इ. स्वरुपाचे बांधकाम परवानगीशिवाय करता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

१४) कॅन्टीन (उपहारगृह) मध्ये ठेकेदार अथवा त्यांचे कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी/डॉक्टर्स/अधिकारी/कर्मचारी/अभ्यागत/पालक यांचेशी सौजन्याने व सहकार्याने वागले पाहिजे. ठेकेदाराने कॅन्टीन (उपहारगृह) ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आवारामध्ये सभ्यतेचे वर्तन ठेवले पाहिजे. आपले कर्मचाऱ्यांनी संबंधीतांशी गैरवर्तन करता कामा नये. कर्मचाऱ्यांबद्दल तक्रारी आल्यास व त्याबाबत अधिकाऱ्यांने तसे सांगितल्यास त्या कर्मचाऱ्यास नोकरीवरुन त्वरीत कमी करावे लागेल. कॅन्टीन (उपहारगृह) बाबत काही तक्रारी असल्यास त्याबाबत संबंधीतांशी हुज्जत न घालता संबंधीतांस कार्यालयात लेखी तक्रार नोंदविण्यात नम्रपणे सांगावे. तसेच उपहारगृहामध्ये नजरेस येईल आशा ठिकाणी तक्रार पेटी ठेवणे आवश्यक आहे. सदर तक्रार पेटीवर समिती/नोडल ऑफीसर यांचे अखत्यारीत नियंत्रण असेल.

१५) ठेकेदाराने अगर त्याच्या कर्मचाऱ्याने कोणतेही गैरवर्तन अथवा बेकायदेशीर व्यवहारकेल्याचे आढळून आल्यास त्याचे टेंडर रद्द करण्यात येईल व त्याशिवाय आवश्यक तीपुढील कायदेशीर कारवाई करण्यास येईल याची मला जाणीव आहे.

१६) यशस्वी निविदाधारकाने हे त्यांचे संस्थेचेच व्यवस्थापन ठेवणे आवश्यक आहे. अन्य कोणासही सदर कॅन्टीन (उपहारगृह) पोटभाडयाने किंवा चालवावयास देता येणार नाही. तसे दिल्याचे आढळून आल्यास मक्ता/ठेका त्वरीत रद्द करण्याचा अधिकार मा. संस्थाप्रमुख अधिष्ठाता यांना राहिल याची मला जाणीव आहे.

१७) मंजूर ठेक्याचा कालावधी कमी/जास्त करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहिल याची मला जाणीव आहे.

१८) ठेकेदाराने १८ वर्ष वयापेक्षा कमी वयाचे कर्मचारी नेमू नये. कॅन्टीन (उपहारगृह) योजनेच्या ठेकेदाराने या व्यवसायाच्या अनुषंगाने जे कोणतेही शासकीय कर असतील तर शासनाच्या संबंधीत खात्याकडे भरण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. या संदर्भात कोणताही वाद/तक्रार निर्माण झाल्यास त्याचे निराकरण ठेकेदाराने संबंधीत शासन विभागाकडून करुन घेणे आवश्यक आहे.

१९) ठेकेदारास आपत्कालीन अत्यावश्यकते वेळी शुल्क वसुली न करणेस सांगण्याचाअधिकारमा. संस्थाप्रमुख यांना राहिल. त्याबाबत ठेकेदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.अगर नुकसान भरपाई मागता येणार नाही.

२०) सदरची निविदा आदेशाच्या दिनांकापासून ते ३ वर्ष मुदत व मंजुर असलेले न्युनतम दर हे ३ वर्षाकरीता राहतील. सदर मुदतीतील काम समाधानकारक असल्यास आहे त्या टप्प्यावर करारनाम्याची मुदत वाढविणे व दरामध्ये वाढ तसेच सदर मुदतीतील काम असमाधानकारक असल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार कॅन्टीनसमिती/अधिष्ठाता यांना राहील याची मला जाणीव आहे.

...5

Scanned with OKEN Scanner

२१) सरकारी हुकूम नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य काही अपरिहार्य कारणांमुळे कॅन्टीन (उपहारगृह) ची जागा बंद राहिल्यास अगर बंद ठेवण्यास सांगावे लागल्यास त्याबाबत ठेकेदारास भरपाई मिळणार नाही याची मला जाणीव आहे.

२२) ठेकेदारास जागेचा वापर करणे शक्य नसल्यास व ठेका बंद करणे असल्यास त्याप्रमाणे तीन महिने आगाऊ लेखी स्वरुपात कळविणे बंधनकारक राहील. यानंतर मा. संस्थाप्रमुख यांचे मान्यतेनंतर तो बंद करता येईल. मात्र नैसर्गिक आपत्ती अपवाद राहिल. याची मला जाणीव आहे.

२३) याप्रमाणे नमुद केलेल्या अटी व शर्तीचा ठेकेदार यांजकडून भंग केल्यास मक्ता/ठेका रद्द करण्याचा तसेच अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. संस्थाप्रमुख यांना असेल याची मला जाणीव आहे.

२४) नमुद केलेल्या सर्व शर्ती व अटी खेरीज अन्य काहीयोग्य आणि कायदेशीर अटींचा समावेश करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता यांस राहिल याची मला जाणीव आहे.

२५) कॅन्टीनमधील वापरात येणाऱ्या सर्व वस्तू, फर्निचर (पूर्वीपासून अस्तीत्वातील जागा,नळ तोटया, फॅन, विद्युत मांडणी वगळून) स्वतःचे असावेत.

२६) सर्व कॅन्टीन (उपहारगृह) ची व्यवस्था संबंधित यशस्वी निविदादाराने पाहावयाची आहे. संबंधित कंत्राटदारांना कोणताही अतिरिक्त मोबदला देय राहणार नाही याची मला जाणीव आहे.

२७) या संस्थेमधील विद्यार्थी/डॉक्टर्स/अधिकारी/अभ्यागत/पालक यांचेकडून जास्तीचे पैसे आकारण्याची तक्रार आल्यास निविदाधारकास अधिष्ठातांच्या आदेशानूसार दंडनीय शुल्कभरावे लागेल याची मला जाणीव आहे.

२८) सदर कॅन्टीन (उपहारगृह) करीता आवश्यक वस्तू/मशिनरी/मान्यताप्राप्त गॅससिलेंडर/फर्निचर/खुर्च्या-टेबल्स इ. आवश्यक वस्तू स्वतः खरेदी करणे आवश्यक व ठेका/करार संपुष्टात आल्यानंतर त्या वस्तू तात्काळ घेऊन जाण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील याची मला जणीव आहे.

२९) खाद्यपदार्थाकरीता वापरात येणाऱ्या वस्तू/कच्चामाल ॲगमार्क अथवा प्रमाणित असलेल्यादर्जांच्या वापरणे बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.

३०) कुठल्याही प्रकारच्या शिळया भाज्या शिळे अथवा कुजलेले अन्नपदार्थ तसेच शासनाने अवैध ठरविलेल्या वस्तू सदर किचन अथवा उपहारगृहात ठेवता येणार नाही. याबाबत



Scanned with OKEN Scanner

या संस्थेचे अधिकृत नोडल ऑफीसर तसेच अन्न व औषधी प्रशासनाचे अधिकारी यांनी उपहारगृहाबाबत आक्षेप अथवा दंडात्मक कारवाई केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील याची मला जाणीव आहे.

३१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती कॅन्टीन (उपहारगृह) बाबत वेळोवेळी लागू केलेले नियम ठेकेदारास पाळावे लागतील तसेच वरिल कोणत्याही अटी शर्तीमध्ये बदल/दुरुस्ती करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत याची मला जाणीव आहे.

३२) कॅन्टीनमध्ये डास, उंदीर, घुश्शी, किटक माश्श्या, झुरळे इत्यादीचा प्रादुर्भाव होणार नाही यासाठी ठेकेदाराने अधिकृत कंपनी मार्फत पेस्ट कन्ट्रोलचा करार करुन वेळोवेळी तसेच आवश्श्यकते वेळी पेस्ट कंट्रोल अधिकृत कंपनीमार्फत करणे बंधनकारक राहील व त्याचा खर्च आपण ठेकेदार यांनीच करावयाचा आहे याची मला जाणीव आहे.

३३)सदर लिफाफा क्र. २ मध्ये नमुद केलेले सर्व पदार्थ मान्य केलेल्या दराने पुढील ३ वर्ष देणे हे बंधनकाराक आहे तसेच त्यात कोणत्याही कारणास्तव कोणतीही दरवाढ करता येणार नाही याची मला जाणीव आहे.

३४)पदार्थांच्या किंमती जास्त तसेच पदार्थांच्या गुणवत्ता दर्जा कमी, अस्वच्छता इत्यादी बाबी आढळल्यास अथवा तश्या तक्रारी प्राप्त झाल्यास संस्थाप्रमुख तसेच कॅन्टीन समिती मार्फत सदर करार रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

३५)कॅन्टीन मधील कार्यरत कर्मचाऱ्यांची दर सहा महिन्यांनी वैद्यकीय तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल प्रशासनास सादर करणे आवश्यक आहे कॅन्टीनमधील कर्मचारी हे दररोज गणवेशावर कॅन्टीनचे व कर्मचाऱ्याचे नाव असलेले स्वच्छ गणवेश परीधान करुनच कार्यरत रहातील अशा महत्वपुर्ण बाबीची पूर्तता न केल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

३६)आपण ठेवलेल्या कामगारांना कुठलाही संसर्गजन्य रोग आढळून आल्यास त्याचे उपचारानंतर वैद्यकीय पात्र प्रमाणपत्र असल्याशिवाय कामावर ठेवता येणार नाही. तसेच सर्व कामगारांची नखे, केस, गणवेश स्वच्छ व निटनेटके असावे याची वेळोवेळी ठेकेदाराने पहाणी करुन आक्षेपार्य नसावे याची दक्षता घ्यावी. याबाबत जबाबदारी ठेकेदाराची राहील याची मला जाणीव आहे.

३७)उपहारगृहाचे सर्व परवाने/दाखले यांचे व संबंधीत कागदपत्रांचे वेळोवेळी नुतनीकरण करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील. सदर/परवाने/दाखले संबंधीत खात्याच्या अधिकारी पथकाने तपासणीस मागितल्यास ती तात्काळ सादर करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. त्याबाबतची तक्रार झाल्यास प्रशासनाची जबाबदारी रहाणार नाही.



Scanned with OKEN Scanner

३८)उपरोक्त सर्व शासकीय देयके वेळेत भरणे व त्याबाबत भरणा केलेल्या देयकांच्या पावत्या प्रशासनाने मागणी केल्यास ती वेळेत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आवश्यक ती कारवाई करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

३९)कॅन्टीनमधील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयाप्रमाणे वेतन अदा करणे आवश्यक आहे. त्याबाबत काही तक्रार उद्भल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील याची मला जाणीव आहे

४०)उपहारगृहामध्ये प्रत्येक खादयपदार्थांचे अदा करण्यात आलेले बील देणे प्रत्येकांना बंधनकारक आहे. व तसे प्रामाणित बिलबुक अथवा इलेक्ट्रॉनिक सिस्टीम ठेवणे व त्याचा हिशेब ठेवणे हि ठेकेदाराची जबाबदारी राहील याची मला जाणीव आहे.

४१)एखादया ग्राहकाची वस्तू मागे राहिल्यास ती अधिष्ठाता कार्यालयामध्ये तात्काळ जमा करावी अथवा त्याची शहनिशा करुन संबंधीतास परत करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

४२)संस्थाप्रमुखांनी नेमणूक केलेले संस्था स्तरावरील नोडल ऑफीसर यांनी वेळोवेळी सदर कॅन्टीनची पहाणी केले पश्चात अटी शर्तीची पूर्तता होत आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल सादर केल्यास त्याप्रमाणे कॅन्टीन समिती मार्फत कार्यवाही करण्यात येईल सदरची कार्यवाही आपणास बंधनकारक राहील.

४३)सदर निविदेत भाग घेतलेल्या यशस्वी निविदाधारक यांनी निविदा लिफाफा क्र.२ मध्ये नमुद केलेले दर हे न्युनत्तम दर असल्याने, त्याबाबत ठेका देण्यास आदेशित करण्यापूर्वी सदर संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यवस्थापक यांना संस्थाप्रमुखांचे समक्ष खालील बाबीची पूर्तता करणे आवश्यक आहे. याबाबतची जाणीव करुन दिल्यानंतरच मान्य असल्यास परवानगीचे आदेश निर्गमित करणे उचित राहील असे सर्वानुमते ठरल्याप्रमाणे झालेला निर्णय मला मान्य आहे.

४४)सदर ठेका दिल्याच्या कालावधीत यशस्वी ठेकेदारामार्फत सदर कॅन्टीनव्दारे पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचा निकृष्ट दर्जा अथवा दर्जा ढासळल्यास तसेच असमाधानकारक असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास, सदर मुदतीपूर्वी कोणत्याही क्षणी सदर कॅन्टीनचा ठेका रद्य करण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहेत याची ठेकेदार संस्थेस जाणीव करुन देण्यात आली व तसे अटी व शर्तीत प्राध्यान्य राहील याबाबत प्रतिज्ञापत्रात नमूद करुन देणे ठेकेदार/संस्थेस बंधनकारक आहे.



Scanned with OKEN Scanner

४५)सदर कॅन्टीन बाबत आदेश निर्गमित झाल्यानंतर कॅन्टीन हॉल व किचनमधील कच्चे अन्नधान्य, वस्तू तसेच स्वच्छतेबाबत समिती सदस्य/नोडल ऑफीसर/अन्न व प्रशासन विभाग/स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत वेळोवेळी तपासणी केल्याचा अहवाल संस्थाप्रमुखांना देणे आवश्यक आहे.

४६)ठेकेदाराने त्यांचे कर्मचाऱ्यांचा शासकीय भरणा उदा. ई.एस. आय./पी.एफ. व इतर भरणा विहीत कालावधीत भरुन त्याच्या चलनाची प्रतव वार्षिक उलाढालीचा चार्टड आकौटंट यांचे तपासणी अहवाल प्रमाणपत्र प्रशासनास सादर करणे बंधनकारक राहील.

४७)शासकीय भरणा उदा. जी.एस.टी.इ. विहीत कालावधीत भरुन त्याच्या चलनाची प्रत प्रशासनास सादर करणे बंधनकारक राहील.

४८)कॅन्टीनमध्ये (हॉल व किचन आतील सर्व भाग) खालीलप्रमाणे ठेकेदाराने वेळोवेळी करावयाच्या दुरुस्त्या.

- ➢ सदर उपहारागृहात वेळोवेळी रंगरंगोटी व देखभाल दुरुस्तीच्या कामाची जबाबदारी ठेकेदाराची/संबंधीत ठेकेदार संस्थेची असेल.
- ➢ सदर उपहारगृहातील दरवाजे, खिडक्या, तावदाने, जाळया, साखळी कडीकोंणंडे, काच तुटलेली असल्यास बदलणे इत्यादी आवश्यक ते बदलण्याची जबाबदारी ठेकेदाराची संबंधीत ठेकेदार संस्थेची असेल.
- ➢ कडप्पा, तत्सम पार्टीशन तुटली असल्यास बदली करणे.
- ➢ जमिनीची फर्शी, टाईल्स, डॅडो, सिंक वॉशबेसीन तुटलेल्या जागी नवीन बसविणे.
- ➢ तोटया, पाईप, तुटफूट असल्यास वेळीच बदली करणे. पाण्याच्या टाकीतील बॉलकॉक बसविणे.
- ➢ पाण्याच्या टाक्या, स्लॅब भिंतीत ओल येत असल्यास बंद करणे.
- ➢ टयुब, बटन, पंखे चालू स्थितीत असावेत. वायरींग आवश्यक दुरुस्त्या तात्काळ केल्या जाव्यात.
- ➢ पाण्याच्या टाक्या, ड्रेनेज लाईन किंवा सेफ्टी टॅक विशीष्ट कालावधीनंतर साफ केले जावेत. तद्नंतर सदर पाण्याच्या टाकीतील पाण्याचा संबंधीत प्रयोगशाळेतून त्याचा रिपोर्ट ठेवणे बंधनकारक आहे. अपवादात्मक परिस्थीतीत सदर बाब प्रशासनामार्फत सोडवीली जाईल.
- ➢ पिण्याचे पाणी निर्जंतूक असण्याकरीता ॲक्वागार्ड सिस्टीमसह वॉटर कुलर चा वापर करणे व वेळोवेळी ते स्वच्छ करणे बंधनकारक राहील.
- ➢ अन्य स्थापत्य विद्युत विषयक कामे असल्यास अथवा तुटल्या असल्यास पुर्ववत करुन घेणे.
- ➢ प्रस्तुत कराराच्या अनुषंगाने होणारा स्टॅम्प डयुटी मसुदा इत्यादी सर्व खर्च ठेकेदार संस्था यांनी करावयाचा आहे.

...८

Scanned with OKEN Scanner

- किचन हे नेहमी स्वच्छ व धूरमुक्त असावे यासाठी घुराडे असणे आवश्यक तसेच किचनमधील भिंती स्वच्छ ठेवाव्यात आणि भिंती व वापरात येणारी सर्व भांडी तेलाचे वंगनमुक्त व स्वच्छ आसावेत.
- थोडक्यात उपहारगृह सुस्थितीत ठेवणे व वेळोवेळी किरकोळ मेंटनंस करुन घेणे.
- किचनमध्ये वापरात येणारे एलपीजी गॅस हे (नॉन डोमॅस्टीक) विना घरगुती प्रमाणित असणे आवश्यक.
- उपहारगृहातील खिडक्या, दरवाजे, सिलींग, फर्नाचर, खुर्च्या, टेबल, भांडी, नेहमी स्वच्छ असावीत.
- सदर उपहारगृहातील (फायर इस्टींगनेशन) आगप्रतिबंधक संयंत्र प्रमाणित नळकांडया ठेवणे बंधनकारक असून, त्या वेळोवेळी सुस्थीतीत ठेवणे, याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
- करार संपल्यास किंवा मुदपूर्व कॅन्टीन नियमाप्रमाणे बंद करावयाचे असल्यास कॅन्टीनचा ताबा सोडताना कॅन्टीनमधील सर्व शासकीय मालमत्ता सुस्थितीत परत करण्याची जबाबदारी ठेकेदार संस्थेची असेल याची मला जाणीव आहे.
- संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई वतीने करारावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती यांना दिलेला आहे.

वरील अनुक्रमे क्र.१ ते ४८ अंतर्गत नमूद सर्व नियम, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला मान्य व बंधनकारक आहे.

सदरचा करारनामा लिहून देणार व लिहून घेणार या दोघांनाही मान्य असून तो आज दि.   /   /२०२५ वार        रोजी लिहून दिला आहे.

साक्षीदार –

लिहून घेणार स्वाक्षरी :
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
बारामती

सही –

नाव –

पत्ता –
ठिकाण –
दिनांक –

साक्षीदार –

लिहून देणार स्वाक्षरी :

सही –

नाव –
पत्ता –
ठिकाण –
दिनांक –

Scanned with OKEN Scanner

# प्रपत्र "ब"

सदर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथील कॅन्टीन उपहारगृह व्यवस्थापन/चालविणे/दिखभाल दुरुस्ती करार तत्वावर मेंन्टनंस करणे व चालविणेबाबत, मी स्वतः लिखीत स्वरुपात नमूद केलेले खालीलप्रमाणे खाद्यपदार्थ सर्व करासह न्युनतम दराने देण्यास तयार आहे. सदर लिफाफा **प्रपत्र ब** मध्ये स्वतंत्र सादर करावा.

**ANNEXURE "B" Bid -2**

| SR NO . | NAME OF ARTICLE | WEIGHT OF EAXH ARTICLE | QUANTITY OF ARTILE | RATES IN RS |
|---|---|---|---|---|
| 1 | TEA (SPECIAL) | 100 ML | - | |
| 2 | NESCOFFEE | 100 ML | - | |
| 3 | IDLI SAMBHAR | 120 GMS | 2 NOS | |
| 4 | MEDU VADA SAMBHAR CHUTNEY | 120 GMS | 2 NOS | |
| 5 | IDLI CHUTNEY | 120 GMS | 2 NOS | |
| 6 | MENDU VADA SAMBHAR | 120 GMS | 2 NOS | |
| 7 | MEDU VADA CHUTNEY | 120 GMS | 2 NOS | |
| 8 | POTATO VADA SAMBHAR | 120 GMS | 2 NOS | |
| 9 | POTATO VADA PAV | 120 GMS | 1 NOS | |
| 10 | BHAJI (MIXED) | 120 GMS | 1 PLATE | |
| 11 | MISAL PAV | 115GMS | 1 PLATE | |
| 12 | USAL PAV | 160 GMS | 1 PLATE | |
| 13 | UTTAPPA (WITH SAMBHAR AND CHUTNEY) | 100 GMS | 1 PLATE | |
| 14 | ONION UTTAPPA (WITH SAMBHAR AND CHUTNEY | 100 GMS | 1 PLATE | |
| 15 | ONION TOMATO UTTAPPA (WITH SAMBHAR AND CHUTNEY | 100 GMS | 1 PLATE | |
| 16 | POHA | 80 GMS | 1 PLATE | |
| 17 | SHEERA (WITH DRY FRUITS) | 100 GMS | 1 PLATE | |
| 18 | PURI BHAJI | 75 GMS | 5NOS(PURI ) | |
| 19 | VEG. SANDWITCH (WITH SOUCE) | 100 GMS | 1 PLATE | |
| 20 | VEG. CHEESE SANDWITCH (WITH SOUCE) | 100 GMS | 1 PLATE | |
| 21 | VEG. CHEESE TOAST | 100 GMS | 1 PLATE | |
| 22 | SAMOSA | 100 GMS | 2 PLATE | |
| 23 | BREAD BUTTER | 70 GMS | - | |
| 24 | SADA DOSA (WITH SAMBHAR AND CHUTNEY) | 80 GMS | 1 PLATE | |
| 25 | MASALA DOSA (WITH SAMBHAR AND CHUTNEY) | 110 GMS | 1 PLATE | |
| 26 | DAHI WADA | 100 GMS | 2 NOS | |
| 27 | EXTRA PAV | - | 2 NOS | |
| 28 | EXTRA SAMBHAR WATI | - | - | |
| 29 | EXTRA CHUTNEY WATI | - | - | |
| 30 | PURI PLATE | - | 5 NOS | |
| 31 | VEG. PULAV WATI CHUTNEY AND PAPAD) | FULL | 1 PLATE | |
| 32 | VEG. PULAV WATI CHUTNEY AND PAPAD) | HALF | 1 PLATE | |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33 | VEG. PULAV WATI CHUTNEY AND PAPAD) | 110 GMS | 1 PLATE | |
| 34 | UPMA | - | 1 PLATE | |
| 35 | POTATO PATIS | | 1 NOS | |
| 36 | LUNCH ( VEGETABLES - DRY AND WITH GRAVY, 1 DAL, 1MOOD RICE, 3 CHAPATI'S/5 PURI'S, 1 VATI CURD, | - | - | |
| 37 | BHAJI ( FROM LUNCH) | - | - | |
| 38 | CHAPATIS | 50 GMS | 1 PIECE | |
| 39 | DAL WATI | - | - | |
| 40 | PAPAD | BIG SIZE | - | |
| 41 | 1 EGG (2) BREAD OMLET | - | - | |
| 42 | 2 EGG (2) BREAD OMLET | - | - | |
| 43 | 1 EGG OMLET/2 EGG OMLET | 80 GMS | - | |
| 44 | 1 EGG MASALA | - | - | |
| 45 | 2 EGG MASALA | - | - | |
| 46 | 2 EGG BHURJI PAV | - | 1 PLATE | |
| 47 | POTATO WADA | 80 GMS | 2 NOS | |
| 48 | PAV BHAJI WITH 2 PAV | 150 GMS | - | |
| 49 | DAL BHAT (1 MOOD AND DAL) | 200 GMS | - | |
| 50 | RICE (1 MOOD) | 100 GMS | - | |
| 51 | SABUDANA KHICHADI WITH CURD | 180 GMS | - | |
| 52 | SABUDANA WADA WITH CURD | 2 NOS | - | |
| 53 | TAK/ MASALA TAK/ LASSI | 250 ml | - | |
| 54 | BHELPURI | 200 GMS | - | |
| 55 | SHEVPURI | 200 GMS | - | |
| 56 | CHIKAN THALI,(RASSA,1MOOD RICE, 3 CHAPATI'S/5 PURI'S&etc.) | - | - | |
| 57 | CHIKAN MASALA | - | - | |
| 58 | MOUTTEN THALI,(RASSA,1MOOD RICE, 3 CHAPATI'S/5 PURI'S&etc.) | - | - | |
| 59 | EGG THALI,(RASSA,1MOOD RICE, 3 CHAPATI'S/5 PURI'S&etc.) | - | - | |
| 60 | ALL TYPE SEASPNABLE FRUIT JUICE | - | - | |
| 61 | DAL KHICHDI | 250 GMS | - | |
| 62 | FISH THALI | - | - | |

**(दरामध्ये कोणत्याही प्रकारे खाडाखोड झाल्यास सदर दरपत्रक अमान्य करण्यात येईल याची नोंद घ्यावी.)**

टेंडरदाराची स्वाक्षरी व
टेंडरदार/संस्थेचा शिक्का

टेंडरदार/संस्थेचे नाव :- .............................

..............................................

टेंडरदाराचा संपुर्ण पत्ता.........................

Scanned with OKEN Scanner

# ठेकेदाराचे प्रतिज्ञापत्र

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथील कॅन्टीन उपहारगृह व्यवस्थापनचालविणे/दिखभाल दुरुस्ती करार तत्वावर मेंन्टनंस करणे व चालविणे.

याबाबतचा टेंडरसेट मी/आम्ही काळजीपुर्वक वाचला असून, टेंडरमधील सर्व अटी व शर्तीप्रमाणे "अ" पाकीटामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची पुर्तता मी/आम्ही केलेली आहे. मी/आम्ही सादर केलेली कागदपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत. या टेंडरमधील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत. मी/आम्ही सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यतेबाबत काही प्रश्न उदभवल्यास किंवा सदरची कागदपत्रे खोटी आहेत असे आढळल्यास टेंडरच्या कोणत्याही टप्प्यावर माझ्यावर कायदेशीर कारवाई करण्यास आणि टेंडरपोटी भरलेली बयाणा / सुरक्षा ठेव / अनामत रक्कम जप्त करुन माझे किंवा माझ्या संस्थेचे नाव काळया यादीत समाविष्ट करणेस माझी काही हरकत नाही.

तसेच सदर टेंडर प्रकरणी माझ्या/ संस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या सर्व सेवकांचे लेबर लॉ अंतर्गत येणाऱ्या सर्वबाबी कामगार विषयक तसेच अन्नव औषंधी प्रशासन विभागा अंतर्गत कायदयाचे पुर्तता करण्याची जबाबदारी माझी/ संस्थेची राहील या संदर्भात एखादा कायदेशीर प्रश्न उदभवल्यास याची सर्व जबाबदारी माझी/संस्थेची राहील व ते माझ्यावर बंधनकारक राहील कामगार कायदयातील तरतूदींचे पालन करण्याची जबाबदारी सुध्दा माझी/ माझ्या संस्थेची राहील.

टेंडरदाराची स्वाक्षरी
टेंडरदार/संस्थेचा शिक्का

टेंडरदाराचे नाव :- ..............................
..................................................

टेंडरदाराचा संपुर्ण पत्ता.........................
.................................................

**टिप :- सदरचे हमीपत्र ठेकेदाराने <u>५००/- रु. चे स्टॅम्प पेपरवर अ पाकिटात</u> सादर करणे बंधनकारक आहे**

Scanned with OKEN Scanner

# ठेकेदाराचे हमीपत्र

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथील कॅन्टीन उपहारगृह व्यवस्थापन/चालविणे/दिखभाल दुरुस्ती करार तत्वावर मेंन्टनंस करणे व चालविणे.

मी/आम्ही याकामाबाबतचे टेंडरसेट /टेंडरमधील नमुदसर्व अटी व शर्ती प्रमाणे"अ" पाकिटामध्ये सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मी/आम्ही केलेली आहे. सदरची कागदपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत तसेच या प्रतिज्ञापत्राव्दारे मी/आम्ही/आमचे कुटुंबीय/नातेवाईक या संस्थेचे अथवा शासकीय/निमशासकीय संस्थेचे सभासद/अधिकारी/कर्मचारी नाहीत, अशी या हमीपत्राव्दारे ग्वाही/हमी देत आहे.

टेंडरदाराची स्वाक्षरी
टेंडरदार/संस्थेचा शिक्का

टेंडरदाराचे नाव :- ..............................
..............................................

टेंडरदाराचा संपुर्ण पत्ता..........................
..............................................

**टिप :- सदरचे हमीपत्र ठेकेदाराने ५००/- रु. चे स्टॅम्प पेपरवर अ पाकिटात सादर करणे बंधनकारक आहे.**

Scanned with OKEN Scanner